नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/08/2023 (शनिवार) सकाळ

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. रामटेक** :– अंतर्गत ०६ किमी अंतरावर डोंगरी टोली ता. रामटेक येथे दिनांक ०९/०८/२०२३ चे १९/०० वा. ते १९/३० वा. पर्यंत फिर्यादी नामे– सौ. बबीता शत्रुघन बावने, वय ५० वर्ष, रा. डोंगरी (टोली) ता. रामटेक ही रोजमजुरीचे काम करते फिर्यादीचे पती नामे– शत्रुघन बावने हे नेहमी दारु पिण्याचे सवयीचे असल्याने फिर्यादीचे त्याचे सोबत पटत नसल्याने ते वेगळे चौघान येथे राहतात. फिर्यादीची मुलगी रेशमा उर्फ पुजा दशरथ कोसरे ही मे महीन्यात तिचे मुलाबाळांसह फिर्यादीकडे राहायला आली होती व दि. ०८/०८/२०२३ रोजी फिर्यादीचे जावई दशरथ कोसरे हे फिर्यादीची मुलगी रेशमा उर्फ पुजा हीला नेण्यास आल्याने फिर्यादीची मुलगी रेशमा ही तिचे मुलाबाळांसह आपले सासरगावी गेली होती. फिर्यादीचे घराचे हॉलमध्ये लोखंडी दिवान असुन दिवानचे उजव्या ड्रावरला लॉक लावुन त्यामध्ये सोन्याचे दागिने असलेली लोखंडी पेटी ठेवलेली होती. दिनांक ०९/०८/२०२३ रोजी फिर्यादी नेहमी प्रमाणे दाराला कडी कोंढा लावुन सकाळी कामावर गेली होती. सायंकाळी ०७/०० वा. दरम्यान फिर्यादीला लोखंडी दिवाणचे उजव्या ड्रावरचे कुलुप तुटलेले दिसले तेव्हा फिर्यादी त्या ड्रावरमध्ये ठेवलेली लोखंडी पेटी उघडुन पाहीले तर तिला पेटीमध्ये ठेवलेले सोन्याचे २० वर्ष पुराने १) ४ ग्रॅमची सोन्याची अंगठी किंमती अंदाजे १०,०००/– रु. २) ४ ग्रॅमची सोन्याचे मंगळसुत्र किंमती १०,०००/– रु. ३) ३ ग्रॅमच्या सोन्याच्या बिऱ्या किंमती ७,०००/– रु. ४) ४ तोळयाचे चांदीचे पायपट्ट्या १ जोड किंमती ४,०००/– रु. मुद्देमाल फिर्यादीला पेटीमध्ये दिसला नाही फिर्यादीने आपले घराचे सर्व सामान उचलुन पाहीले पण सोन्याची अंगठी व मंगळसुत्र, कानातील बिऱ्या तसेच चांदीच्या पायपट्ट्या एक जोड दिसला नाही कोणीतरी अज्ञात चोराने ४ ग्रॅम सोन्याची अंगठी व ०४ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र, ३ ग्रॅम सोन्याच्या कानातील बिऱ्या तसेच चांदीच्या पायपट्ट्या एक जोड एकुण किंमती ३१,०००/– रुपयाचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लांजेवार पोस्टे रामटेक मो. क्र. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत १२ किमी अंतरावर घोगली वार्ड क्रमांक तीन येथे दिनांक ११/८/२०२३ चे ८/०० वा. ते १४/४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— लीलाधर शिवाजी गौतम, वय ४६ वर्ष, रा. घोगली वार्ड क्रमांक तीन व फिर्यादीची पत्नी हे बँक ऑफ महाराष्ट्र येथे पैसे जमा करण्याकरिता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे गेटचे कुलूप तोडून आत प्रवेश करून किचनमध्ये ठेवलेल्या अलमारीतील सोन्या—चांदीचे दागिने १) सोन्याचे कानातले एक जोड वजन एक ग्रॅम किंमती ३५००/— रुपये २) सोन्याचे मंगळसूत्र वजन दहा ग्रॅम किंमती ३५०००/— रुपये ३) चांदीची पायल दोन जोड वजन वीस ग्रॅम किंमती १०००/— रुपये ४) रोख रक्कम ९०००/— रुपये असा एकूण ४८,५००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने घराच्या आत घुसून चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राउत ब. नं. ४७८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**